# इतरांचे हक्क पायदळी तुडविणारा राष्ट्रद्रोहीच!

**म. टा. प्रतिनिधी, मुंबई**



**निवृत्त न्या. सायरिक जोसेफ यांचे प्रतिपादन**

हल्ली राष्ट्रवादाचे स्तोम वाढले आहे. मात्र राष्ट्रवादाच्या नावाखाली इतरांचे हक्क पायदळी तुडविणारा राष्ट्रप्रेमी नसून, तो राष्ट्रद्रोहीच आहे. राष्ट्रवाद आणि मानवी हक्कांचे रक्षण यांच्यात योग्य संतुलन असायला हवे, असे प्रतिपादन शनिवारी सर्वोच्च न्यायालयाचे निवृत्त न्या. सायरिक जोसेफ यांनी मानवी हक्क दिनानिमित्त बोलताना केले.

मानवी हक्क हा जगण्याचा मार्ग बनावा, असे सांगून त्याची शिकवण स्वतःच्या घरापासूनच सुरू करण्याची आवश्यकता आहे. सुरक्षारक्षकांनी दहशतवाद्यांना मारले की मानवी हक्काविषयी आवाज उठविला जातो. तथापि, निरपराध व्यक्तींचा बळी जातो तेव्हाही मानवी हक्काचा भंग होत असल्याकडे जोसेफ यांनी लक्ष वेधले. मानवी हक्काविषयी तात्त्विक भूमिका घेण्याऐवजी व्यावहारिक दृष्टिकोन हवा. पोलिस आणि सुरक्षारक्षकांवर होणारा अत्याचार हासुद्धा मानवी हक्काचा भंग असल्याचे ते म्हणाले.

दरम्यान, राज्य मानवी हक्क आयोगाचे अध्यक्ष न्या. एस. आर. बन्नूरमठ यांनी यावेळी आयोगाच्या कामाचा आढावा घेऊन स्वतःच्या हक्काप्रमाणेच इतरांच्या हक्कासाठीसुद्धा लढा देण्याची गरज असल्याचे स्पष्ट केले. 'इतरांच्या हक्कासाठी पुढे या' हे यंदाच्या मानवी हक्क दिनाचे हे घोषवाक्य असल्याची माहिती त्यांनी दिली.

यावेळी राज्य मानवी हक्क आयोगाच्या नव्या संकेस्थळाचे उदघाटन जोसेफ यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी आयोगाचे सदस्य एम. ए. सईद यांनी प्रास्ताविक केले, तर सदस्य भगवंतराव मोरे यांनी आभारप्रदर्शन केले. आयोगाचे सचिव अमिताभ जोशी व विशेष पोलिस महानिरीक्षक किशोर जाधव हेही उपस्थित होते. शिल्पा नातू यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले.

> **द्रौपदीचे वस्त्रहरण करताना सर्वांनी मौन धारण केले होते. कौरवांचा बंधू विकर्ण याने दुर्योधनाच्या भूमिकेला विरोध केला होता. त्या विकर्णाला कधीच प्रसिद्धी मिळाली नाही, मानवी हक्काच्या लढ्यात सर्वांनी विकर्णासारखी सत्याची कास धरावी.**